**दि.२७/०८/२०१९**

# प्रेसनोट

## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

## मुंढवा भागामधील पादचा-यांना लुटणारे पोलीसांच्या कर्तव्यदक्षतेमुळे गजाआड

दि.२६/०८/२०१९ रोजी रात्रौ. २.०० वा. चे सुमारास इसम नामे आशीष अरुण कार्जी वय १८ वर्षे, रा.भारत फोर्ज कंपनी जवळ खराडकर चाळ मुंढवा पुणे हा त्याचे मित्रा सोबत हॉटेल वेस्टीन समोरील बसस्टॉप येथुन घरी जात असताना फुटपाथवर उभ्या असलेल्या दोन अज्ञात इसमांनी आशीष व त्याचा मित्रास सिगारेट पेटविण्यसाठी लाइटरची मागणी करुन जवळ बोलावून घेतले असता, त्या दोघांनी फिर्यादीस व त्यांच्या मित्रास हाताने मारहाण करुन त्यांच्या जवळील पैसे व मोबाइल जबरीने चोरी करुन पळून गेले. त्यावेळी फिर्यादी यांनी इतर नागरीक व पोलीसांच्या मदतीने दोन इसमास ताब्यात घेतले असता, त्यांची नावे १.आकाश गंगाधर जगताप वय-२३ वर्षे,रा.बिल्डींग नंबर ०५ ताडीवाला रोउ पुणे २. राज उल्हास भोसले वय-२० वर्षे रा मारुती मंदीराजवळ ताडीवाला रोड पुणे असे आहे. मुंढवा पोलीस ठाणे गु.र.नं. २७९/२०१९ भा.द.वि. कलम ३९२,३४ अन्वये तात्काळ गुन्हा नोंद करुन गुन्हयातील चोरी गेलेला मुद्देमाल ४३,२८०/- रुपये किंमतीचे २ मोबाईल, रोख रक्कम व गुन्हयात वापरलेली ॲक्टीवा स्कुटर जप्त करण्यात आली असून, सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक गवळी हे करीत आहे.

सदर आरोपीतांस रात्रगस्त अधिकारी सहा पोलीस निरीक्षक पंडीत रेजितवाड व पोलीस उप-निरीक्षक अमोल गवळी, सहा पोलीस फौजदार सुरेश सोनवणे, पोहवा कैलास चव्हाण, पोना निलेश जगताप, अमोल गायकवाड, निलेश गायकवाड, अमोल चव्हाण, पोशि शाम शिंदे, श्रीनाथ जाधव, दिपक कांबळे,संदेश काकडे, यांनी आरोपींचा शोध घेऊन आरोपींना पकडुन उपरोक्त कामगिरी केली आहे.

तरी नमूद पोलीस अधिकारी व कर्मचायांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

दि.२७/०८/२०१९

(संपतराव डी. भोसले)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर